रेग्युलर दिवाणी दावा क्र.७५५/२०२१
गोविंद वि शेषेराव इतर
नि.क्र.३२/ क (सोबत)

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र.१</u>**

**<u>उलट तपासणी प्रतिवादी क्र.३ तर्फे वकील श्री. एच.व्ही. गायकवाड यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. मी प्रतिवादी क्र.३ अरुणाबाई हिला ओळखतो. तिचा सर्वे नंबर मला माहीत नाही. अरुणाबाई हिने माझ्याविरुध्द कोणतीही केस केलेली नाही. अरुणाबाई हिने तिची जमीन मोजली आहे. अरुणाबाई हिच्या जमिनीची मोजणी होऊन तहसीलदामार्फत हद्दी खुणा कायम करण्यात आल्या होत्या याबाबत मला माहीत नाही. माझ्या सरतपासाचे शपथपत्रातील परिच्छेद क्र.४ मधील मजकूर मला दिसत नसल्यामुळे वाचता येत नाही. मला मागील एक ते दोन वर्षापासून आजारी असल्यामुळे दिसत नाही. मी शपथपत्रावर सही केलेली नाही. माझ्या शपथपत्रातील मजकूर मला वाचून दाखविल्याशिवाय कळणार नाही.

२. माझ्या जमिनीचा सर्वे नं.१५१ आहे. सदर जमीन माझी वडीलोपार्जित आहे. मला एक भाऊ व चार बहिणी आहेत.

**प्रश्न-** तुमच्यामध्ये जमिनीची वाटणी झाली आहे का?

**उत्तर-** आम्हा दोघा भावांमध्ये वाटणी झालेली आहे, बहिणींमध्ये नाही.

वाटणीपत्र लिहीलेले आहे, ते मी दाखल करु शकतो. मी जमिनीची मोजणी केलेली नाही. वाटणीच्यावेळीही जमीनीची मोजणी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी केल्याशिवाय माझ्या ताब्यात किती क्षेत्र आहे हे समजून येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, अरुणाबाईने माझ्याविरुध्द दावा दाखल केला, तो मंजूर झाला होता, त्यानंतर तिने सदर जमिनीची मोजणी करुन हद्दी खुणा कायम करुन घेतल्या होत्या. अरुणाबाई माझ्या जमिनीत येऊन अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे मी सदरचा दावा दाखल केला आहे. माझा भाऊ शेषेराव याची जमीन माझ्या जमिनीच्या पुर्वेला आहे. शेषेरावच्या जमिनीच्या पुर्व दिशेला अरुणाबाईची जमीन आहे. शेषेराव व अरुणाबाई यांच्या जमिनीमध्ये सामाईक बांध आहे, माझ्या व अरुणाबाईच्या जमिनीमध्ये बांध नाही. शेषेरावचे अरुणाबाईशी जमिनीबाबत वाद आहे. मला पश्चीमेकडील जमीन व माझ्या भावाला पुर्वेकडील जमीन दिल्याबाबत वाटणीचा कागद माझ्याकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेषेराव व मी दोघांनी अरुणाबाईविरुध्द संगनमताने दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जमिनीच्या पुर्वेला लागून अरुणाबाईची जमीन नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री. एस.के. कस्तुरे व प्रतिवादी क्र.४ तर्फे वकील श्री. एस.के. मोरे करीता उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत

दि.२२/०८/२०२४

**(श्रीमती. व्ही. डी. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.